# आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय

राज्य उत्पादन शुल्क भवन, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००0१.

ई-निविदा नोटीस क्र.शाआमक/उपहारगृह कंत्राट/२०२४ दिनांक- १२ जून, २०२४.

**ई-निविदा (उपहारगृह कंत्राट)**

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र मुंबई राज्य् उत्पादन शुल्क भवन इमारतीच्या उपहारगृहाकरीता कंत्राटदराकडून दोन लिफाफा पदधतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा भरण्याची पदधत शासनाच्या संकेतस्थळ (https://mahatenders.gov.in/) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ई- निविदा संबंधित कागदपत्रे वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ई- निविदा कंत्राटदाराने वरील संकेतस्थळावरुन घ्यावी. कंत्राटदाराला ई-निविदा शुल्क रुपये १५००/- ऑनलाईन पदधतीने ई-निवीदा संकेतस्थळावर भरण्यात यावी. सदर शुल्क ना परतावा आहे.

निविदाधारकांस निविदा सादर करण्यास काही शंका असल्यास त्याचे निराकरण निविदेपूर्वी बैठकीत करण्यात येईल. निविदा भरण्याची अंतिम तारीख २१/०६/२०२४ असून निविदा शुल्क परत मिळणार नाही.

**ई-निविदा संबंधी महत्वाची माहिती**

| अ.क्र | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | ई- निविदा नोटीस | (https://mahatenders.gov.in/) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| २ | कामाचे स्वरुप | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र मुंबई राज्य् उत्पादन शुल्क भवन इमारतीचे उपहारगृह १२ महिने चालविण्याचे कंत्राट (२०२४-२०२५) |
| ३ | ई- निविदा शुल्क् | प्रत्येकी रुपये १५००/- ऑनलाईन पदधतीने ई-निवीदा संकेतस्थळावर भरण्यात यावी. |
| ४ | संपर्कासाठी पत्ता | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र मुंबई राज्य् उत्पादन शुल्क भवन महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००0१. |
| ५ | दूरध्वनी क्र. | ०२२-२०८२२४७७ |
| ६ | ई-मेल | comm.excise@maharashtra.gov.in |
| ७ | ई- निविदा वैधता | १० दिवसांकरीता |

निविदा सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे व जोडपत्रे जोडावी .कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## निविदा सादर करावयाच्या पद्धती

1. प्रत्येक निविदाकाराला एकच निविदा भरता येईल.
2. निविदा भरण्यापूर्वी निविदाकाराने स्वतः प्रत्यक्ष राज्य उत्पादन शुल्क भवनास भेट देऊन उपहारगृह व परिसराची पाहणी करून नंतर निविदा दाखल करावी.
3. अ) तांत्रिक निविदा ऑनलाईन पध्दतीने सादर करताना (अपलोड करताना) खालील कागदपत्रांचा समावेश असेल.
    1. संस्थेच्या लेटरहेड वर दिलेले विवरणपत्र (प्रपत्र अ मध्ये).
    2. संस्था संबंधीत सेवा पुरविण्यासाठी अधिकृत असल्याचे राज्य केंद्र शासनाच्या आवश्यक विभागाचे नोंदणी प्रमाणपत्र
    3. संस्थेच्या संचालकांनी स्वतःचे नाव कार्यालयीन पत्ता व संपर्क कमांक यांचे विवरणपत्र,
    4. नोंदणीकृत आस्थापनेला अनुसरुन आवश्यक वैयक्तिक मालकाचे या संस्थेचे पॅन कार्ड असावे
    5. GST नोदणी प्रमाणपत्र कमीत कमी सहा महिने आधीचे GST भरणा केल्याचे चलन
    6. मागील २ वर्षाचे आयकर विवरणपत्र (इन्कमटॅक्स) भरल्याचा पुरावा.
    7. राज्य शासन केंद्र शासन अथवा यांची अंगीकृत संस्था यांना सेवा पुरवण्याचाबत अनुभव प्रमाणपत्र,
    8. निविदा शुल्क रु.1500/- ऑनलाईन पध्दतीने भरल्याची पावती.
    9. राज्य कामगार विमा योजना रजिस्ट्रेशन कमांक व सर्टीफीकेट (सहा महिने आधीचे भरणा केल्याचे चालान)
    10. प्रोफेशनल टैक्स सर्टीफिकेटस (सहा महिने आधीचे भरणा केल्याचे चलन)
    11. Shop Act (Canteen) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
    12. अनामत रक्कम रु.१९,२००/- ऑन-लाईन पध्दतीने भरल्याची पावती,
    13. वरील सर्व कागदपत्र https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर BOQ Excel Format मध्ये कुठलीही दुरुस्ती न करता भरण्यांत याची व अपलोड करण्यात यावी.

ब) वाणिज्यिक दरपत्रक

वाणिज्यिक दरपत्रक सोबत जोडलेल्या प्रपत्र व मध्ये वाणिज्यिक निविदा प्रपत्र संस्थेच्या लेटरहेडवर भरन सही व शिक्का असलेला काम BOQ Excel Format upload करण्यात यावा

क) निविदा उघडण्याच्या कार्यपध्दती

1. दिलेल्या तारखेप्रमाणे ऑनलाईन निविदा उघडण्यात येतील व समितीद्वारे तांत्रिक छाननी करण्यात येईल

2. निविदाकाराने Scan करुन Upload केलेले सर्व प्रमाणपत्र व वैचना तपासण्यात येईल.
3. पात्र निविदा धारकाची यादी विभागाच्या web site वर upload करण्यात येईल.
4. तांत्रिक बाबींच्या छाननी मधून फक्त पात्र असलेल्या निविदा धारकांच्या वाणिज्यिक निविदा उपडण्यात येईल.
5. वाणिज्यिक निविदेत संपूर्ण कामाचा सर्व करासहीत एकत्रित दर नमूद नसल्यास निविदा फेटाळण्यात येईल.
6. दोन किंवा अधिक निविदाकारांच्या दरामध्ये समानता असल्यास स्थानिक सेवापुरवठाधारकास प्राधान्य देण्यात येईल.

ड) कार्यारंभ आदेश देण्याची कार्यपध्दती

1. सेवा पुरवठाकाधारकाने रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा नोटरी करून सादर करणे आवश्यक आहे.
2 अनुक्रमांक 1 ची पुर्तता केल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल व त्यानंतर १५ दिवसाच्या आत रूपये ६,००,००० /- सुरक्षा ठेव बैंक गॅरंटी (राष्ट्रीय बँकेतील स्वरुपात जमा करावी लागेल करार संपण्यापूर्वी काम बंद केल्यास त्यांची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.)

उपरोक्त सिलबंद निविदा जाहिरातीत दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे स्विकारण्यात व उघडण्यात येईल याकरीता वेगळा पत्रव्यवहार किंवा दूरध्वनीद्वारे कळविल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी,

| अ.क | कार्य विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करण्याचा दिनांक | १२.०६.२०२४ |
| २ | संकेतस्थळावर ई-निविदा उपलब्ध करणे | १२.०६.२०२४ |
| ३ | ई-निविदा सादर करण्याचा सुरुवातीचा दिनांक | १२.०६.२०२४ |
| ४ | ई-निविदा सादर करण्यांचा अंतिम दिनांक | २१.०६.२०२४ |
| ५ | तांत्रिक निविदा छाननी | २५.०६.२०२४ |
| ६ | सर्व वाणिज्यिक निविदा उघडणे | २८.०६.२०२४ |

प्रपत्र अ

तांत्रिक निविदा विवरण पत्र (उपहारगृहात खाद्यपेय माफक दरात पुरवठा करण्यासाठी कंत्राट)

(संस्थेच्या लेटरहेडवर)

१. कंत्राटदाराच्या संस्थेचे नाव व संपूर्ण कार्यालयीन पत्ता-
२. संस्थेचा नोंदणी क्रमांक व नोंदणीकृत पत्ता-
(नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत अपलोड करावी)
३. ज्या प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली आहे त्याचा संपूर्ण पत्ता-
४. निविदाधारक/संस्था चालकांचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्र. व ई. मेल पत्ता-
५. अनुभवाचा तपशील (आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करावी)
६. निविदाधारक/ संचालकाचे ओळखपत्राचा तपशिल-
७. आवेदन शुल्क रूपये १५००/- भरल्याचा पुरावा अपलोड करावा.
८. अनामत रक्कम रूपये १९,२००/- भरल्याचा पुरावा अपलोड करावा.
९. नोंदणीकृत आस्थापनेला अनुसरुन आवश्यक वैयक्तिक मालकाचे अथवा संस्थेचे पॅन कार्ड असावे,
१०. उद्‌योग आधार रजिस्ट्रेशन सर्टीफीकेट (सोबत प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत जोडावी)
११. GST नोंदणी प्रमाणपत्र
१२. ई. पी. एफ, रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट
१३. मागील २ वर्षाचे आयकर विवरणपत्र
१४. कंपनी मागील २ वर्षाचे वार्षिक उलाढालीचे प्रमाणपत्र (Turn over Certificate) सी.ए. च्या सहीने जोडावेत.
१५. अनुभवाचा पुरावा (कार्यारंभ आदेश व इतर)

स्थळ- सही

दिनांक- (पूर्ण नांव व पत्ता)

प्रपत्र ब

वाणिज्यिक निविदा विवरणपत्र (उपहारगृहात खाद्यपेय माफक दरात पुरवठा करण्यासाठी कंत्राट)

१. सेवापुरवठादाराच्या संस्थेचे नांवः-

२. कामाचे वर्णनः-

उपहारगृह व स्वयंपाकगृहाचे एकूण क्षेत्रफळ  २११.९९ चौ. मी. आहे, त्याअंतर्गत विभागवार कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे. प्रत्यक्ष  उपहारगृहाचा आढावा घेउन दर सादर करावेत,

| अ.क | कंत्राटी तत्वावर पुरविण्यात येणारे सेवेचा दर | दर माह भाडे (कर वगळून) रुपये |
|---|---|---|
| 1 | उपहारगृहात खाद्यपेय माफक दरात पुरवठा करणे (दरपत्रक अटी व शर्ती सोबतच्या परिशिष्ठ अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

टीपः परिशिष्ठ - अ मध्ये खाद्य पदार्थांचे जे दर नमूद केलेले आहेत ते त्या पदार्थांचे महत्तम दर आहेत. पात्र निविदाकारापैकी जो निविदाकार जागेचे दरमहा भाडे (कर वगळून) जास्त देईल त्याची निवड केली जाईल.

स्थळः-

दिनांकः-

निविदा पत्रक क्र.
मूल्य – रु.१५००/-

# निविदा पत्रक
## उपहारगृह कंत्राट सेवा देणेबाबत अटी व शर्ती

दोन पाकीटे पद्धतीप्रमाणे (तांत्रिक व आर्थिक) ऑन-लाईन द्वारे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र मुंबई राज्य् उत्पादन शुल्क भवन या येथील संस्थेकरिता उपहारगृह कंत्राट सेवा (१२ महिन्यांकरिता ) करारपद्धतीने बेरोजगार सहकारी सेवा संस्था (ज्यांची नोंदणी सहकार निबंधक कार्यालयात / महाराष्ट्र शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागात असावी.) किंवा राज्य / केंद्र शासनाने सेवा पुरवठादार म्हणून नोंदणीकृत निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदेचा तपशील | अंदाजित रक्कम रु | निविदा शुल्क रु | अनामत ठेव रक्कम रु. |
|---|---|---|---|
| बारा महिने कालावधी करीता राज्य् उत्पादन शुल्क भवन या इमारतीच्या उपहारगृह चालविण्याकरिता कंत्राट सेवा पुरविण्याबाबत | १९,२०,०००/- (वार्षिक). कर वगळून. दर माह – रु.१,६०,०००/- (कर वगळून) जागेचे भाडे असेल | १५००/- | १९,२०० /- |

**<u>उपहारगृहाकरिता खाद्यपेय पुरवठादाराने पाळावयाच्या अटी व शर्थी पुढीलप्रमाणे आहेत.</u>**

१) खाद्यपेय पुरवठादारास ५00/- रू मुद्रांकित कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर उपहारगृहाच्या वापरांबंधीचा करारनामा करावा लागेल, सदर करारनाम्यात खालील नमूद केलेल्या अटी , शर्ती व मुदत यांचा समावेश असेल व त्या खाद्यपेय पुरवठादारास बंधनकारक राहतील.

२) उपहारगृहाकरिता लागणारी स्वयंपाकाची उपकरणे उदा. स्टीलची भांडी, ताटे, वाटया, चमचे, काटे चमचे, ग्लास, कपबशी व प्लेटस् इ. सर्व साहित्य खाद्यपेय पुरवठादाराने स्वखर्चाने या कार्यालयाच्या प्रतिनिधीच्या पसंतीनुसार खरेदी करून वापरावयास आणावी लागतील.

३) खाद्यपेय पुरवठादाराने उपहारगृहाकरिता लागणारे सर्व सज्ञान कर्मचारी स्वतःच्या खर्चाने नेमतील. त्यांचे वेतन मजूरी (किमान वेतन अधिनियमाच्या अधीन राहून) नियामाचे पालन करतील. नेमलेला कर्मचारी अनुभवी, सुशिक्षित व साधारणतः उपहारगृहाकरीता आवश्यक असलेले प्रशिक्षण घेतलेला असावा.

४) खाद्यपेय पुरवठादारास उपहारगृह चालवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व कर्मचारी स्वखर्चाने नेमावे लागतील हे सर्व कर्मचारी १८ वर्षावरील व अनुभवी व निरोगी असावेत. उपहारगृहात नेमलेल्या कर्मचाऱ्यांची खाद्यपेय पुरवठादाराने पूर्वचारित्र्य तपासणी संबंधित जिल्हा शहर पोलीस अधिकाऱ्यांकडून करून घेणे बंधनकारक राहील.

५) उपहारगृहात ठेवलेल्या कर्मचाऱ्यांना ओळखपत्रे त्यांच्या छायाचित्रासह पोशाखासह लावणे बंधनकारक राहील. कर्मचाऱ्यांना दिलेला पोशाख नेहमी स्वच्छ राहील याची दक्षता घेणे. तसेच करारनाम्यातील अटीचे शर्तीचे तसेच वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे नीट पालन करणे बंधनकारक राहील.

६) खाद्यपेय पुरवठादाराने उपहारगृहात ठेवलेले पदार्थ यांची गुणवत्ता अन्न व औषधी व द्रव्य गुण नियंत्रण अधिकारी तसेच महानगरपालिकेचे अधिकृत प्रतिनिधी करतील. त्या पदार्थांची गुणवत्ता संबंधित विभागाच्या मापदंडानुसार असणे आवश्यक राहील.

७) खाद्यपेय पुरवठादाराने उपहारगृहात  नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम  ही कर्मचारी इन्शुरन्स ॲक्ट नुसार तसेच कामगार रूग्णालये रक्कम व इतर लागू असलेल्या नियमांचे पालन करणे व परस्पर संबधीत कार्यालयाकडे भरणा करणे बंधनकारक राहील. त्यास खाद्यपेय पुरवठादार सर्वस्वी जबाबदार राहील व या प्रकरणी  मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क अथवा त्यांचे प्रतिनिधी जबाबदार  राहणार नाहीत.

८) या विभागाने दिलेल्या जागेचे भाडे महिन्याच्या ५ तारखेपर्यंत आगाऊ भरणे खाद्यपेय पुरवठादारास बंधनकारक आहे. भाडे जर १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकित राहिल्यास खाद्यपेय पुरवठादारा सोबत केलेला करारनामा रदद् केला जाईल.

९) उपहारगृहाचा  भाडे करारनामा  हा १२ महिन्यांचा असेल. करारनाम्याची मुदत संपल्यानंतर या विभागाला योग्य वाटल्यास व खाद्यपेय पुरवठादाराची इच्छा असल्यास १२ महिन्यांकरीता  पुन्हा मुदतवाढ देण्यात येईल. त्यासाठी करारनामा  करण्यात येईल. सदर मुदतवाढ केवळ दोनदाच १२-१२ महिन्याकरिता दिली जाईल. त्याबाबत वेळोवेळी करारनामे करण्यात येतील. एकदा नेमलेला खाद्यपुरवठादार यांनी दिलेली सेवा उत्तम दर्जाची असेल व विभागाला योग्य वाटली तर त्यांना प्रथम मंजूरीच्या दिनांकापासून जास्तीत जास्त ३६ महिन्यापर्यंत सेवा देण्यास मुदत वाढ दिली जाईल. त्यापेक्षा जास्त कालावधी वाढवून दिला जाणार नाही. त्यांनतर पुन्हा नवीन निविदा मागवून खाद्यपेय पुरवठादार नेमण्यात येईल.

१०) खाद्यपेय पुरवठादारास उपहारगृह चालविण्यास दिल्यानंतर  त्याचा कोणताही  भाग व्यवसायासाठी पोट भाडे पध्दतीने देता येणार नाही. तसेच उपहारगृह सुध्दा इतरांना चालविण्यास देता येणार नाही.

११) भाडे करार संपल्यानंतर सदर जागेचा ताबा शांततामय पध्दतीने  विभागाच्या  प्रतिनिधीस तात्काळ देणे खाद्यपेय पुरवठादारास बंधनकारक राहील. जर विहीत मुदतीत जागा खाली करुन न दिल्यास त्यांचे साहित्य उपहारगृहाबाहेर ठेवले जाईल व जागेचा ताबा एकतर्फी घेतला जाईल याची नोंद घ्यावी.

१२) परिशिष्ठ - ब मध्ये खाद्यपदार्थाचे दर नमूद केलेले आहेत. त्याप्रमाणे या विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांना पदार्थाचा पुरवठा करावा लागेल. पदार्थांच्या गुणवत्तेचा दर्जा खालवला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३) उपरोक्त करारनाम्यातील  सर्व अटी व सूचना मी/आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत असे बंधपत्र यशस्वी बोलीधारकास द्यावे लागेल.

१४) उपहारगृहाच्या  उपयोगासाठी करारनाम्यामध्ये  नमूद केलेल्या जागेचे व पुरविलेल्या साहित्याचे भाडे दरमहा किमान रू.१,६०,०००/-  अथवा बोली मध्ये नमूद केलेली रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम शासनास भरणे बंधनकारक राहील.

१५) खाद्यपेय पुरवठादार उपहारगृह चालविण्यास मान्यता दिल्यानंतर त्याने सुरक्षा ठेव रक्कम रु ६,००,०००/- या विभागाकडे जमा करावी लागेल. सदरची रक्कम करार संपल्यानंतर सेवापुरवठादारास परत केली जाईल व त्यावरील व्याज दिले जाणार नाही.

१६) उपहारगृहात नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वेतन व मजूरी किमान वेतन नियमाच्या अधीन राहुन द्यावी लागेल.

१७) मासिक वीज शुल्क  व पाणी वापराचे मासिक शुल्कापोटी येणारा खर्च खाद्यपेय पुरवठादारास करावा लागेल. सदर बील वेळोवेळी भरणे बंधनकारक राहील.

१८) खाद्यपेय पुरवठादारास उपहारगृह चालविण्यासाठी दिलेल्या जागेत खाद्यपेय पुरवठादाराने कोणतीही मोडतोड केल्यास किंवा त्याच्यामुळे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाईसाठी नियंत्रण अधिकारी यांनी यांचे दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील.

१९) खाद्यपेय पुरवठादारास व्यवसायाकरीता उपहार गृहाची दिलेली कोणतीही जागा उप-व्यवसायासाठी (उदा. पान सुपारी, सिगारेट, भेलपूरी, इ.) पोट भाडयाने देता येणार नाही. असे आढळून आल्यास नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार करारनामा संपुष्टात आणण्या इतपत कार्यवाही करण्यात येईल.

२०) खाद्यपेय पुरवठादाराने उपहारगृहाकरीता वापरण्यास दिलेल्या सदरहू इमारतीच्या भागाचा विस्तार किंवा त्यातील फेरबदल नियंत्रण अधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही. सदरील अटीचा भंग झाल्यास नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार खाद्यपेय पुरवठादार दंडास पात्र राहील व त्याबाबतचा खर्च विभागास अदा करावा लागेल.

२१) नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार खाद्यपेय पुरवठादारास उपहारगृहाकरीता  वापरावयास दिलेल्या जागेवर / भागावर शासनाच्या  मालमत्तेसंबधी खाद्यपेय पुरवठादारास कोणताही मालकी हक्क किंवा अधिकार निर्माण करणार नाही किवा त्यावर कोणताही मालकी हक्क मागणार नाही . तसेच उपहारगृहाकरिता वापरावयास दिलेल्या जागेत ठेवल्या गेलेल्या खाद्यपेय पदार्थामुळे  अथवा गॅस सिलेंडरमुळे मालमत्तेची नुकसान होणार नाही याची जबाबदारी  खाद्यपेय पुरवठादारांची राहील. जर नुकसान झाले तर होणाऱ्या खर्चाची रक्कम वसूल केली जाईल.

२२) फर्निचर सोबत जोडलेल्या विरणपत्राप्रमाणे आयुक्त, राज्यउत्पादन शुल्क कार्यालयाच्या उपहारगृहाकरीता शासनातर्फे पुरविलेल्या फर्निचरची दुरूस्ती व निगराणी ही पुरवठादारास पुरवावी लागेल यात जाणूनबुजून तोडमोड झाल्यास खाद्यपेय पुरवठादारास स्वखर्चान दुरूस्ती करावी लागेल.

२३) किचन ओट्याची आवश्यक उभारणी विभागामार्फत केलेली आहे.  अद्ययावत किचनसोबत घरघंटी, वॉटर कुलर, फ्रीज, खुर्च्या-९८, टेबल-१९या वस्तूंचा ताबा देण्यात येईल.  त्या सर्व वस्तूंचा वापर व्यवस्थितपणे करणे सेवापुरवठादाराचे काम आहे. या वस्तूंचा वापर चुकीच्या पध्दतीने केल्यामुळे नुकसान झाल्यास त्याची वसूली सेवा पुरवठादाराकडून केली जाईल.

२४)  गॅस सिलेंडरची व्यवस्था व  कँटीन सुरू केल्यानंतर प्रत्येक महिन्यात गॅस सिलींडर्सकरीता येणारा खर्च खाद्यपेय पुरवठादाराने करावयाचा आहे.

२५) अतिरिक्त फ्रिज, डिफ्रिजर, किचन रेन्ज, विद्युत शेगड्या,  हॉटप्लेट, हॉटप्लेट केसेस इत्यादी खाद्यपेय गरम किंवा थंड स्थितीत राहाण्यासाठी साहित्य लागल्यास सर्व साहित्य पुरेशा प्रमाणात खाद्यपेय पुरवठादारास स्व:खर्चाने आणावे लागेल.

२६) खाद्यपेय पुरवठादारास उपहारगृहात नेमलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची वैद्यकिय तपासणी दर सहा महिन्याने वैद्यकीय अधिकाऱ्याकडून करुन घ्यावी लागेल. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले तपासणी प्रमाणपत्र नियंत्रण अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावे लागेल. वैद्यकीय तपासणीत एखादा कर्मचारी अपात्र ठरल्यास त्यास खाद्यपेय पुरवठादाराने  सेवामुक्त करणे सक्तीचे आहे. अपात्र कर्मचाऱ्यांना सेवामुक्त न केल्यास खाद्यपेय पुरवठादारावर कारवाई केली जाईल.

२७) खाद्यपेय पुरवठादाराने खालील बाबींची पूर्तता करावी.

अ) तांदुळ, ज्वारी, गहू, बाजरी, धान्यडाळी व कडधान्ये उत्कृष्ट व चांगल्या प्रतीची असावीत.

ब) चांगल्या व प्रसिध्द कंपनीने तयार केलेल्या वनस्पती तुपाचा व पुरस्कृत शेंगदाण्याच्या तेलाचाच वापर काटेकोरपणे करावा. एगमार्कने मान्य केलेल्या वस्तू वापरण्यात याव्यात.

क) भाज्या व खाद्यपदार्थ तयार करताना पुरस्कृत शेंगदाण्याच्या ताज्या तेलाचा वापर करावा.

ड) मांसाहरी व शाकाहरी पदार्थासाठी प्रत्येक प्रकारास योग्य प्रकारचा वेगवेगळा मसाला वापरावा. मसाला उत्तम प्रतीचा असावा. त्यात लवंग, वेलदोडे, दालचिनी, मिरे, उचे शहाजिरे इत्यादीचा योग्य प्रमाणात वापर व उत्तम स्वाद असावा.

ई) पालेभाजी, मेथीची भाजी, चवळी, मटकी, शेवग्याच्या शेंगा, गवार, भेंडी, वांगी, बटाटे, टोमॅटो व तत्सम भाज्या व पदार्थाचा दररोजच्या जेवनासाठी अधूनमधून बदल करून वापर करावा, सर्व भोजन व उपहाराचा पदार्थ, मसाले व जेवण महाराष्ट्रीयन पध्दतीचे असावेत.

फ) खाद्यपेयाचा दर फलक स्पष्ट व मोठ्या अक्षरात दिसतील अशा ठिकाणी भोजन गृहात लावण्यात यावा, मेनूकार्ड स्पष्ट व मोठ्या अक्षरात छापील तक्त्यात प्लास्टीक कव्हरमध्ये प्रत्येक टेबलावर ठेवावे.

ग) खाद्यपेय पुरवठादारास नियंत्रण अधिकारी यांनी उपहारगृहाच्या खाद्यपेय सुधारणेसाठी वेळोवेळी केलेल्या सुचनाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी लागेल.

कक) उपहारगृहातील अन्नपदार्थ सामुग्रीची नियंत्रण अधिकारी किंवा त्यांचे नियुक्त प्रतिनिधी अधून मधून अचानकपणे तपासणी करतील आणि जर असे आढळून आले की, पुरविलेले अन्नपदार्थ हे मानवी वापरासाठी निकृष्ट किंवा अयोग्य असतील तर मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी ठरविलेल्या कार्यवाहीस किंवा दंडास तसेच कंत्राट समाप्ती करीता सेवापुरवठादार पात्र राहतील.
खाद्यपेय पदार्थाच्या व्यवस्थेबाबतीत नियंत्रण अधिकारी यांचे समाधान न झाल्यास किंवा या कराराच्या कोणत्याही उपरोक्त अटीपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास खाद्यपेय पुरवठादारास एक लेखी सूचना पाठवण्यात येईल व या सूचनेच्या तारखेपासून एक महिन्यानंतर किंवा पर्यायी व्यवस्था होईपर्यंत नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार कंत्राट संपुष्टात आणण्यात येईल. खाद्य व्यवसाय सोडून देण्याची खाद्यपेय पुरवठादाराची इच्छा असल्यास अगर आपला खाद्यपेय व्यवस्था व्यवसाय बंद करावयाच्या असल्यास अशा आशयाची तीन महीने आधी लेखी सूचना नियंत्रण अधिकारी यांना देणे खाद्यपेय पुरवठादारास बंधनकारक राहील. खाद्यपेय व्यवस्था अचानक बंद केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल व सदर रक्कम अनामत रक्कमेतून वसूल केली जाईल.

२८) स्वच्छता :

अ) खाद्यपेय पुरवठादारास उपहारगृह चालविण्याकरीता दिलेल्या जागेत अन्नपदार्थ, घटक द्रव्य व स्वयंपाक घराची सर्व जागा धुवून पुसून स्वच्छ ठेवावी लागेल. नियंत्रण अधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधीनी नैमत्तिक केलेल्या तपासणीच्या व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे लागेल.
ब) खाद्यपेय पुरवठादाराने उपहारगृहाची जागा दिवसातुन दोन वेळा फिनाईलने धुवून स्वच्छ करणे आवश्यक आहे. तसेच प्रसाधनगृहे व हात धुण्याची जागा इत्यादी स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. उपहारगृहातील स्वच्छतेबाबत कोणतीही तक्रार येता कामा नये. याबाबत योग्य ती दक्षता उपहारगृह पुरवठादाराने घ्यावी.
क) उपहारगृहातील स्वयंपाकगृहात व साठवण करण्याच्या जागेत कोणत्याही प्रकारच्या किटकाचा उंदरांचा व पालीचा उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली जावी. त्याकरीता महिन्यातुन एकदा किंवा दोनदा किटक नाशके द्रव्य खाद्यपेय पुरवठादाराने उपहारगृहात स्वखर्चाने मारून घेणे बंधनकारक राहील.

**२९) पदार्थ व धान्याची साठवण :**

अ) खाद्यपेय पुरवठादार सर्व अन्नधान्याचे पदार्थ त्यांनी केलेल्या साठवण कक्षात व्यवस्थितपणे साठवून ठेवणे आवश्यक आहे. तेल तुपाचे पदार्थ हे स्वंतत्रपणे ठेवावे लागतील. अन्नधान्य, तेल-तुप या पदार्थशेजारी किंवा त्याखाली कोणतेही ज्वालाग्राही पदार्थ साठवू नये, रॉकेल व तत्सम ज्वलनशील द्रव्ये याचा साठा करू नये.

ब) मांसाहरी पदार्थ उदा. मांस, अंडी व मासे इ. शितकपाटात ठेवून सुरक्षिततेची खाद्यपेय पुरवठादारांनी काळजी घ्यावी.

**३०)** अन्न व औषधी द्रव्य, गुण नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत उपहारगृहात विक्रीसाठी असलेल्या पदार्थांच्या तपासणीचा सर्व खर्च खाद्यपेय पुरवठादारांस करावा लागेल. तसेच महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ फुड अडल्टरेशन नियम, १९६२ चे प्रचलित नियम खाद्यपेय पुरवठादारास बंधनकारक राहील. अन्न व औषध प्रशासन विभाग व महानगरपालिकेकडून आवश्यक परवाना घेण्याची जबाबदारी व त्यासाठी असलेले शुल्क भरण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील.

३१) **दंडात्मक योजना :**

अ) उपहारगृहातील खाद्यपेय पदार्थाच्या सेवनामुळे उपभोक्त्याच्या स्वास्थात अन्न व विषबाधा इत्यादी सारखे गंभीर बिघाड निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी खाद्यपेय पुरवठादाराची राहील. याबाबतची कोणतीही जाबाबदारी नियंत्रण अधिकारी तसेच त्यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींची असणार नाही.

ब) नैसर्गिक आपत्ती वगळता खाद्यपेय पुरवठादार खाद्यपेय पुरवठा कोणत्याही करणास्तव बंद केल्यास नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार खाद्यपेय पुरवठादार दर दिवशी रू.५०००/- प्रति दिन दंडास पात्र राहील.

३२) **सर्वसाधारण शर्ती व अटी :**

**अ)** खाद्यपेय पुरवठादार तक्रार नोंदवही उपहारगृहातील काऊंटरवर ठेवणे बंधनकारक राहील.

ब) या करारनाम्या अंतर्गत असलेल्या शर्ती व अटी संबंधात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याबाबचा अंतिम निर्णय हा नियंत्रण अधिकारी देतील व तो खाद्यपेय पुरवठादारावर बंधनकारक राहील.

**३३)** कॅन्टींन करीता उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या एकूण जागेचे क्षेत्रफळ.

राज्य उत्पादन शुल्क भवनाच्या पहिल्या मजल्यावरील उपहारगृह व स्वयंपाकगृह या जागेचे एकूण क्षेत्रफळ २२८१ चौ.फूट इतके आहे. त्याकरिता व साहित्य (स्वयंपाकगृहातील व टेबल/ खुर्च्या इ.) यासाठी दरमहा किमान रु.१, ६०,०००/- इतके भाडे अपेक्षित आहे. भाडे करार हा यशस्वी बोलीधारकाच्या रक्कमेवर केल्यानंतर तो करार १२ महिन्यांसाठी लागू राहील. परंतु तद्नंतर पुढील १२ महिन्यांसाठी करार वाढवून देण्यात आला तर १०% दरवाढ लागू राहील.

३४) जो बोलीधारक / निविदाकार उपहारगृह चालविण्यासाठी जास्त रक्कम देईल त्यास हे चालविण्यास दिले जाईल. परंतु सर्व तांत्रिक बाबी व अर्हता पूर्ण केलेली असावी. तसेच नमूद केलेल्या दरानेच पदार्थांची विक्री १२ महिने करावी लागेल.

३५) नोंदणीकृत, अनुभवी व इतर अर्हता पूर्ण करणाऱ्या निविदाकारालाच आर्थिक बोलीची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**दरपत्रक (परिशिष्ठ- अ)**

| | परिमाण | दर |
|---|---|---|
| चहा | १३० मि.लि. | १० |
| नेस कॉफी | १५० मि.लि. | २० |
| कांदा पोहे | १२० ग्रॅम | ३५ |
| उपमा | १२० ग्रॅम | ३५ |
| शिरा | १२० ग्रॅम | ३५ |
| कांदा भजी | १५० ग्रॅम | ३५ |
| बटाटा भजी | १५० ग्रॅम | ३५ |
| मिसळ पाव | १५० ग्रॅम | ४० |
| दही वडा | १५० ग्रॅम | ४० |
| बटाटा वडा २ नग | २०० ग्रॅम | ३० |
| वडा पाव (१ वडा व पाव) | १०० ग्रॅम +१ पाव | २० |
| समोसा १ नग | १०० ग्रॅम | १५ |
| मेदू वडा सांबार २ नग | २०० ग्रॅम | ४५ |
| इडली (२ नग)चटणी सांबार | २०० ग्रॅम | ४० |
| साधा डोसा चटणी सांबार | १२० ग्रॅम | ३५ |
| मसाला डोसा चटणी सांबार | १५०ग्रॅम | ५० |
| उतप्पा साधा/ कांदा | २०० ग्रॅम | ५० |
| साबुदाणा वडा २ नग | १५० ग्रॅम | ५० |
| साबुदाणा खिचडी | २०० ग्रॅम | ५० |
| ब्रेड बटर / जाम २ नग | | २० |
| वेज सँडविच | १५० ग्रॅम | ३५ |
| व्हेज चीज टोस्ट सँडविच | १५० ग्रॅम | ५५ |
| व्हेज ग्रील चीज टोस्ट सँडविच | १५० ग्रॅम | ६० |
| गुलाबजाम २ नग किंवा जिलेबी ३ नग | १०० ग्रॅम | २० |
| ब्रेड ऑमलेट (२ अंडे) | २०० ग्रॅम | ४० |
| शाकाहारी थाळी<br>( २ चपाती किंवा १ भाकरी, २ भाजी, भात, वरण, लोणच, पापड, गोड पदार्थ, कोशिंबीर) | | १२० |
| मटण थाळी<br>(२ चपाती किंवा १ भाकरी, मटण/ चिकन, भात, रस्सा, गोड पदार्थ, कोशिंबीर) | | १५० चिकन /२०० मटण |
| मांसाहारी थाळी<br>(२ चपाती किंवा १ भाकरी, मासे, भात, रस्सा, गोड पदार्थ, कोशिंबीर) | | १७५ |
| चिकन प्लेट | ३०० ग्रॅम | १०० |
| मटण प्लेट | २५० ग्रॅम | १२० |
| बिस्कीटस् पारले जी, गुड डे, मारी, क्रॅक जॅक | | एमआरपी नुसार |
| शीतपेये- पेप्सी, थम्सअप, मँगोला, माझा, स्लाइस, मिरिंडा, सोडा, सेवनअप | | |
| मिनरल वॉटर बॉटल्स<br>( मान्यता प्राप्त कंपनीचे २५० मि.ली. ५०० मि.ली. व १ लिटर) | | |
| टीप – उपरोक्त खाद्य पदार्थखेरीज अन्य पदार्थ विक्री करावयाचे असल्यास त्याबाबतचे दर या कार्यालयाच्या मान्यतेने निश्चित करावे लागतील. | | |